**नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक**

प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.


# सभासदांच्या मतीमंद पाल्यांसाठी 'मतीमंद पाल्य कर्ज योजना' नियमावली

१. सदर नियमास **'नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक'** या बँकेचे **'मतीमंद पाल्य कर्ज योजना '** असे नाव राहील.

२. कर्ज मागणी करणारा सभासद हा सभासद होवुन पाच वर्ष पुर्ण झालेला असावा.

३. कर्जाची कमाल मर्यादा रु.१,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख मात्र) इतकी राहील.

४. मतीमंद पाल्य हा ५०% किंवा त्यापेक्षा जादा मतिमंद असल्याबाबतचे **'मेडिकल बोर्डाचे'** (वैद्यकिय मंडळाचे) सर्टिफिकेट कर्ज अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

५. सदर कर्जाचा व्याजदर ११% इतका राहील मात्र कर्ज थकबाकीत झाल्यास, सदरचे थकीत रकमेस जादा २% दंड व्याज आकारण्यात येईल.

६. कर्जासाठी परतफेड कालावधी ३ वर्षाचा राहील. कर्ज मंजुरीसाठी सभासदांची किमान ३ वर्षे सेवा शिल्लक असणे आवश्यक आहे.

७. कर्जाची परतफेड कर्ज उचल तारखेच्या पुढील महिन्यापासुन लगेचच मासिक हप्ता पद्धतीने सभासदाचे पगारातून चालू होईल.

८. मतीमंद पाल्यांसाठीच कर्ज रक्कम वापरणेचे हमीपत्र घेऊन सभासदाचे नांवाने सदर कर्ज अदा केले जाईल.

९. कर्जासाठी दोन जामीनदार, कर्ज रकमेच्या ५% शेअर्स व १०% वर्गणी ठेव जमा करणे आवश्यक राहील.

१०. सभासदांच्या पाल्य या संकल्पनेत सभासदाचा पती, पत्नी, मुलगा अथवा मुलगी यांचाच फक्त समावेश राहील.

११. सदरचे कर्ज तीन वर्षातुन एकदाच घेता येईल.

१२. सदरचे कर्ज मंजुरीपुर्वी सभासदांच्या हातात सदर कर्जाचा होणारा हप्ता धरुन किमान १/३ वेतन हातात मिळणे आवश्यक आहे.

१३. वरील नियमात फेरफार अथवा बदल करणेचा अधिकार मा. संचालक मंडळास राहील.

**संचालक मंडळ सभा दि.११/१२/२०२२ विषय क्र. १२ अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.१५/१२/२०२२ पासुन लागु करण्यात येत आहे.**

(सुरेश पाटील)
मुख्य कार्यकारी अधिकारी

(मंदाकिनी पवार)
उपाध्यक्षा

(सुधीर पगार)
अध्यक्ष